गोवा सरकार
माहिती आणि प्रसिध्दी खाते
पणजी-गोवा
वार्तापत्र

## स्वातंत्र्यदिन कार्यक्रमास हजर राहण्यास स्वातंत्र्य सैनिकांसाठी कदंब बस सेवेची व्यवस्था

ता. 06 ऑगस्ट 2019
15 श्रावण 1941

स्वातंत्र्य सैनिकांना पणजी येथील जुन्या सचिवालयाजवळ सकाळी 8.45 वाजता होणाऱ्या स्वातंत्र्यदिन कार्यक्रमास हजर राहण्यासाठी गृह खात्याने कदंब बसेसची व्यवस्था केली आहे. 15 ऑगस्ट रोजी म्हापसा येथील हुतात्मा चौकाजवळ सकाळी 8.00 वाजता जीए-03-एक्स-0283 या क्रमाकाची बस स्वातंत्र्य सैनिकांना घेऊन पणजीला येईल.

जुन्या सचिवालयाजवळचा कार्यक्रम संपल्यानंतर पणजी फेरी धक्क्याजवळ पार्क करून ठेवलेल्या जीए-03-एक्स-0283,(बसचालक श्री. हेमंत केरकर, बॅच नं. 2708, संपर्क क्रमांक 9765727622/2410311) आणि जीए-03 एक्स-0551,(बसचालक श्री.सच्चित एन. परब, बॅच नं. 5326, संपर्क क्रमांक 8412877508/2438034) क्रमाकाच्या बसेस स्वातंत्र्य सैनिकांना घेऊन पत्रादेवीला जाणार आणि पत्रादेवी येथील कार्यक्रम संपल्यानंतर दुपारी 12.30 वाजता या दोन्ही बसेस स्वातंत्र्य सैनिकांना घेऊन पणजीला परततील.

मा/वाप/एमएस/जॉआ/रना/प्रधु/2019/438

DIRECTORATE OF INFORMATION AND PUBLICITY.
THIRD FLOOR,UDYOG BHAVAN,
NEAR AZAD MAIDAN, PANAJI GOA